# डोंगरविश्वाची व्याख्यानमाला!

**प्रतिनिधी :** डोंगरात फिरताना निसर्गरम्य दृश्य, बेलाग कडे, मजबूत तटबंदीचे किल्ले त्यांची बांधणी, विविध पक्षी, लेणी तर हिमालयाचे मोहक रूप या सर्वांचा अनुभव भटक्याला सतत येत असतो. पण या सर्वांची योग्य ती माहिती, शास्त्रीय कारणे अशा गोष्टींसाठी मात्र तज्ज्ञांचीच गरज भासते. या जाणीवेतूनच मुलुंडच्या 'चक्रम हायकर्स'ने एक आगळी वेगळी व्याख्यानमाला आयोजित केली होती.

रौप्य महोत्सवी वर्षात प्रवेश केलेल्या चक्रमच्या अनोख्या उपक्रमांना सर्वत्र गिरीप्रेमी डोंगराचे एक वेगळ्याच दृष्टीने पुन्हा आकलन झाल्याचे दिसून आले.

दऱ्या डोंगरातील लेणी, पक्षी, हिमालयाचा विस्तार, दुर्गबांधणी, खगोलशास्त्र आणि शिवकाल अशा विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या या व्याख्यानांना ठाणे, डोंबिवली या पूर्व उपनगराबरोबरच मुंबईकरांचा पण अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. कडे कपाऱ्यात योग्य कातळ शोधून केवळ छिन्नी हातोड्याच्या सहाय्याने मनमोहक लेणी कशी खोदली गेली याचे अभ्यासू वर्णन दाऊद दळवी यांनी केले. लेण्याचे प्रकार, त्यांचा खोदण्याचा काळ कसा ओळखावा याची माहिती स्लाइडसद्वारे त्यांनी मांडली. तर खगोलतज्ज्ञ प्रो. मोहन आपटे यांनी शिवकाळ आणि खगोलशास्त्राच्या संबंधावर अभ्यासू विश्लेषण केले. संगणक प्रणालीचा वापर करून शिवकालीन ६ महत्त्वाच्या घटना आणि त्यावेळचे आकाश याचा शास्त्रीय संबंध जाणकारांना अनुभवता आला.

व्याख्यानमालेच्या तिसऱ्या सत्रात महाराष्ट्राच्या गिर्यारोहण क्षेत्राची मुहूर्तमेढ रोवणाऱ्यांपैकी एक प्रा. रमेश देसाई यांनी हिमालयाचे अवाढव्य रूप सहजतेने सर्वांना उलगडून दाखविले. साधनांच्या कमतरतेत त्यांनी तयार केलेले हिमालयीन डोंगररांगांचे नकाशे ही या सर्वांवर कडीच होती. हिमालयाच्या व्याप्तीबरोबरच त्यासंबंधित व्यक्तींबद्दलच्या रोचक माहितीमुळे त्यांच्या सादरीकरणास वेगळाच पैलू लाभला.

सह्याद्रीचा मानदंड असणाऱ्या किल्ल्यांवरती प्रकाश टाकला तो प्रा. प्र. के. घाणेकर यांनी. या गडकिल्ल्याचा अतिशय प्रभावी उपयोग करणाऱ्या शिवरायांच्या दुर्गनीतीतील वैशिष्ट्यपूर्ण पैलू खांदेरी-उंदेरी, सिंधुदुर्ग, रायगड राजगड या वरील बांधकामे व त्यांचे महत्त्व याद्वारे उलगडून दाखविले. त्यांनी गडकोट कसे पहावेत याचे मार्गदर्शन दुर्गप्रेमींना केले.

समारोपाच्या सत्रात दऱ्या-डोंगरातील निसर्गबरोबरच शहरी भागातदेखील पक्षी सौंदर्य कसे पाहता येते, याचे चित्रण डॉ. श्रीरंग बखले यांनी केले. त्याचबरोबर पक्ष्यांना इजा झाल्यास त्यावर काय करता येईल, आपल्या परिसरात पक्षी यावेत यासाठी कोणती झाडे असावीत, अशी उद्‌बोधक माहिती त्यांनी दिली. विशेष म्हणजे बच्चेकंपनीचा या फिल्मला जोरदार प्रतिसाद लाभला.

रौप्य महोत्सवानिमित्ताने सभा-समारंभ करण्याऐवजी डोंगरातील अशा अनोख्या विश्वाचे दर्शन या व्याख्यानमालेमुळे घडले. ■